26 MAR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाशी सामंजस्य करारांची संधी

## कुलगुरू डॉ. पाटील; सदिच्छा भेटीत डॉ. शिर्के यांच्याशी संवाद



कोल्हापूर : राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

कोल्हापूर, ता. २५ : कृषी विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठादरम्यान विविध विषयांत सामंजस्य करार करण्याची मोठी संधी असल्याचे राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी डॉ. पाटील यांचा सत्कार केला. डॉ. पाटील मूळचे सांगली जिल्ह्यातील कवठेएकंदचे आहेत. यापूर्वी ते भारतीय कृषी अनुसंधान परिषद येथे संचालक होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "प्राणिशास्त्र विभाग, रेशीमशास्त्र, जैविक कीड नियंत्रण तसेच विविध कृषी पीक किडींचा बंदोबस्त, मत्स्य विज्ञान आणि वनस्पतीशास्त्रामध्ये विविध जाती, पिके, औषधी वनस्पती, सुगंधी तेल, केळी, टिश्यू कल्चर याबाबत संशोधन व सहकार्यास मोठा वाव आहे. जैवतंत्रज्ञान, ॲग्रोकेमिकल, पेस्ट मॅनेजमेंट, फूड व नॅनो सायन्समध्येही संशोधन सहकार्य करता येईल."

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. एसमत्रे, डॉ. ए. डी. जाधव उपस्थित होते.

2 6 MAR 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कृषी विषयक संशोधनास सहकार्य करु

## कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के : राहुरी कृषी विद्यापीठ कुलगुरुंची विद्यापीठास सदिच्छा भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभाग, रेशीमशास्त्र, जैविक कीड नियंत्रण तसेच विविध कृषी पीक किडींचा बंदोबस्त, मत्स्य विज्ञान आणि वनस्पतीशास्त्रामध्ये विविध जाती, पिके, औषधी वनस्पती, सुगंधी तेल, केळी, टिश्यू कल्चर इत्यादी बाबत संशोधन व सहकार्यास मोठा वाव आहे. तसेच, जैवतंत्रज्ञान, ॲग्रोकेमिकल, पेस्ट मॅनेजमेंट, फूड व नॅनो सायन्समध्ये देखील संशोधनास सहकार्य करता येईल, असे कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांनी सांगितले.

राहुरी (अहमदनगर) येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे नूतन कुलगुरु डॉ.प्रशांतकुमार पाटील यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. यावेळी कृषी विषयक संशोधनाबाबत चर्चा करण्यात आली. कुलगुरू डॉ.पाटील मूळचे सांगली जिल्ह्यातील कवठे एकंद येथील आहेत. यापूर्वी ते भारतीय कृषी अनुसंधान परिषद येथे संचालक म्हणून कार्यरत होते. कृषी विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या दरम्यान विविध विषयांच्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्यास मोठी संधी असल्याचे कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. व्ही. एस मन्ने, सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनक्युबेशनचे समन्वयक डॉ. ए. डी. जाधव आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : राहुरी कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील यांचा सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.

2 6 MAR 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोरोना काळात होमिओपॅथीचे महत्त्व वाढले

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : होमेसाकॉन परिषद; तीन हजारांहून होमिओपॅथसचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोरोना काळात अर्सेनिक अल्बम या औषधाचा वापर प्रतिबंधात्मक उपचार म्हणून झाल्यामुळे होमिओपॅथीचे महत्त्व वाढले, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज एक्स स्टुडंटस असोसिएशन (होमेसा)ने ताराराणी चौक (कोल्हापूर) येथील होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या सभागृहात आयोजित केलेल्या 'होमेसाकॉन २०२१' परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



कोल्हापुरातील ताराराणी चौकातील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज एक्स स्टुडंटस असोसिएशन (होमेसा)तर्फे 'होमेसाकॉन' परिषदेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, होमिओपॅथींनी आयुष्यभर नवनवे शिकत राहावे व स्वत:चे वैद्यकीय ज्ञान सतत अपडेट ठेवून संशोधनाचे नाते जोडावे. ज्यामुळे संपूर्ण समाज आरोग्यदायी राहील. कोरोना संक्रमणात वैद्यकीय क्षेत्रातील होमिओपॅथीसह सर्वच विभागांचे महत्त्व वाढले आहे. हे नाकारून चालणार नाही. कोरोनामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित झाले.

'नॅशनल कमिशन फॉर होमिओपॅथी'ची रचना, कायदा व उद्दिष्ट्ये यासह त्याचा होमिओपॅथी औषधप्रणालीच्या विकासावर होणारे परिणाम प्राचार्य डॉ. रोझारिओ डिसोझा (गडहिंग्लज) यांनी यांनी विषद कले. परिषदेत डॉ. मनीषा शर्मा (मुंबई), डॉ. पायल परमार (मुंबई) यांचेदेखील व्याख्यान झाले. प्रारंभी होमेसा प्रेसिडेंट डॉ. राजकुमार पाटील यांनी स्वागत केले. संयोजक सचिव डॉ. सुनेत्रा शिराळे यांनी 'कोरोना-काहीही कायमचे टिकत नाही' या परिषदेच्या संकल्पनेबाबत मार्गदर्शन केले. परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. हिम्मतसिंह पाटील, डॉ. सुहास पाटील, डॉ. अन्वर गंजेली, आदींनी परिश्रम घेतले. परिषदेत तीन हजारांहून होमिओपॅथसनी ऑनलाईन पद्धतीने सहभाग घेतला होता.

तरुण भारत



कोल्हापूर – 'बिझनेस कॉरस्पाँडंट मॉडेल अँड इट्स रोल इन बँकिंग सेक्टर' या प्रासंगिक शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. शिर्के, सोबत डॉ. मारुलकर, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. महाजन, डॉ. विलास नांदवडेकर.

# व्यवसाय दूतांच्या नियुक्तीने स्थानिक रोजगाराला बळ

प्रतिनिधी
कोल्हापूर

- कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन
- डॉ. एस. एस. महाजन यांच्या प्रासंगिक पुस्तिकेचे प्रकाशन

व्यवसायदूतांच्या (बिझनेस कॉरस्पाँडंट) नियुक्तीमुळे बँकिंग व्यवसायासह स्थानिक रोजगाराभिमुखतेला बळ मिळेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन यांच्या 'बिझनेस कॉरस्पाँडंट मॉडेल अँड इट्स रोल इन बँकिंग सेक्टर'' या प्रासंगिक शोधनिबंधाच्या पुस्तिकेचे प्रकाशन बुधवारी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए.एम. गुरव उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, बँकांनी गतिमान स्पर्धेला तोंड देण्याच्या दृष्टीने तसेच व्यवसाय विस्तारासाठी विविध उपाय योजले. आज विविध बँकांचे मिळून एकूण ५ लाख ४१ हजाराहून अधिक व्यवसायदूत कार्यरत असल्याची आकडेवारी लक्षात घेतली असता या मॉडेलचा बँकांना लाभ झाला, हे तर खरेच आहे. मात्र, त्याचबरोबर बँकांच्या कक्षेत येऊ न शकणारे ग्राहकही बँकेशी जोडले गेले, हा दुसरा लाभ झाला. तिसरा आणि अखेरचा लाभ म्हणजे ग्रामीण भागातील युवकांना जागेवर रोजगार उपलब्ध झाला.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, आंतरराष्ट्रीय, खाजगी बँकांचे जाळे देशभरात विस्तारत असताना ग्रामीण भारताच्या आर्थिक सबलीकरणासाठी व्यवसायदूत ही संकल्पना महत्त्वाची आणि उपकारक ठरली आहे. प्रा. महाजन यांनी प्रासंगिक शोधनिबंधाविषयी माहिती देऊन प्रास्ताविक केले. डॉ. के. बी. मारुलकर यांनी आभार मानले.

तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# दीक्षांत समारंभास व्यवस्थापन परिषदेची मान्यता

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा सहा एप्रिल



रोजी होणाऱ्या दीक्षांत समारंभास गुरुवारी व्यवस्थापन परिषदेच्या झालेल्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दीक्षांत समारंभ ऑनलाइन पद्धतीने होणार असून विद्यार्थ्यांना पोस्टाद्वारे घरपोच प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ ६ रोजी होत आहे. या समारंभास व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळाली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हा सोहळा ऑनलाइन पद्धतीने होत आहे. तसेच महाविद्यालयांमध्ये होणारा समारंभ रद्द करण्यात आला आहे. पदवी प्रमाणपत्रासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सुमारे ७० हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना घरपोच प्रमाणपत्र देण्याचे नियोजन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
2 6 MAR 2021 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन सुविधांचा लाभ घ्या

▪ शिवाजी विद्यापीठाचे डॉ. राजेंद्र सोनकवडे यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सामान्य सुविधा केंद्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची अत्याधुनिक संशोधन पृथक्करण उपकरणे उपलब्ध आहेत. या उपकरणांचा संशोधकांसह विविध उद्योग-व्यवसायिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ विज्ञान उपकरण केंद्र व सामान्य सुविधा केंद्राचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी केले आहे.

डॉ. सोनकवडे म्हणाले, शिवाजी विद्यापीठात विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याद्वारे १९७९ साली 'विद्यापीठ विज्ञान उपकरण केंद्राची (USIC) उभारणी करण्यात आली. या केंद्रांतर्गतच १९८४ साली 'सामान्य सुविधा केंद्राची' (सी.एफ.सी.- कॉमन फॅसिलिटी सेंटर) सुरुवात झाली. संशोधन क्षेत्रातील विविध पदार्थांच्या नमुन्यांच्या पृथक्करणाची सुविधा अत्यंत अल्पदरात सर्वांना उपलब्ध करून देणे, हा उद्देश होता. केंद्राची सुरवात अवघ्या चार उपकरणांपासून झाली. आज या केंद्रात अत्याधुनिक, अद्ययावत अशी एकूण १२ उपकरणे आहेत.

**'परीक्षणासाठी ऑनलाईन बुकिंग'**

संशोधनांतर्गत विविध पदार्थांच्या नमुन्यांचे पृथक्करण अल्प दरात उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सामान्य सुविधा केंद्रात पृथक्करणासाठी ऑनलाईन बुकिंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. संकेतस्थळावरील केंद्राच्या पृष्ठावरच ही सुविधा उपलब्ध करण्यात येईल. देय रक्कम केंद्राला प्राप्त झाल्यानंतर ऑनलाईन बुकिंगचा संदेश संबंधितास मोबाईलवर प्राप्त होईल, अशी माहितीही डॉ. सोनकवडे यांनी दिली.